महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ११० वा | दिनांक : २४/०१/२०२५ | वार : शुक्रवार

## दावोसमधून १५ लाख ७० कोटींची गुंतवणूक आणली

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस दौऱ्यावर आहेत. याठिकाणी ते वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसाठी सहभागी झाले. राज्य सरकारने जागतिक आर्थिक परिषदेत आतापर्यंत ६१ सामंजस्य करारांवर सह्या केल्या असून यातून १५ लाख ७० कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

दावोसमध्ये महाराष्ट्राची शक्ती काय आहे? ती मांडण्याची संधी मिळाली. वेगवेगळ्या देशातील प्रतिनिधींसोबत संवाद साधला. या ठिकाणी ६ राज्यांचे मुख्यमंत्री आणि मंत्री होते. भारत म्हणून आम्हाला आमची भूमिका मांडता आली, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. दावोसमध्ये वेगवेगळ्या टेक्नोलॉजी शिकायला मिळाल्याचेही त्यांनी सांगितले. ते दावोस येथून दृकश्राव्य माध्यमातून आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

दावोसमध्ये ६१ एमओयू करण्यात आले. एकूण १५ लाख ७० कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या गुंतवणुकीमुळे राज्यात १६ लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. विदर्भ, एमएमआर, मराठवाड्यासह नाशिकसाठी करार करण्यात आले, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले. महाविकास आघाडीचे सरकार असताना दावोसमध्ये ५० हजार कोटींचे करार केले होते. आता जास्त करार झालेले आहेत. भारताची आणि महाराष्ट्राच्या वाढणाऱ्या ताकदीचे द्योतक हे करार आहेत, असेही ते म्हणाले.

एमओयू करारांमध्ये परिवर्तीत होतील का? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. देशभरातमध्ये एमओयूंचा ॲक्च्युल गुंतवणुकीत परिवर्तीत होण्याचा रेशो ४० टक्के आहे. पण महाराष्ट्रात तो ६५ ते ७० टक्के आहे. मागील दावोसचा विचार केल्यास तो ९५ टक्के आहे. त्यामुळे आता केलेले करार सिरीयस प्लेअर्स आहेत. आज महाराष्ट्र डेटा सेंटर कॅपिटल होत आहे. सध्या डेटाची किंमत ऑईलपेक्षा जास्त झाली आहे. डेटा सेंटर कॅपिटल झाल्यामुळे महाराष्ट्र इन्व्होशन आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्समध्ये मोठ्या प्रमाणात पुढे जाणार असल्याचा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

१. कंपनीचे नाव : क्रॉसरेल इंटरनॅशनल (यूके) + यूके वाहतूक विभाग सामंजस्य करार : मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक पायाभूत सुविधांचा विकास आणि कार्यक्षमतेतील सुधारणा एकूण गुंतवणूक : धोरणात्मक अभ्यासासाठी सहाय्य

२. कंपनीचे नाव: यूनिव्हर्सिटी ऑफ बर्मिंगहॅम सेंटर फॉर रेल्वे रिसर्च अँड एज्युकेशन, यूके सामंजस्य करार : मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) शाश्वत शहरी वाहतूक साध्य करणे एकूण गुंतवणूक: धोरणात्मक अभ्यासासाठी सहाय्य

३. कंपनीचे नाव: ब्रुकफिल्ड कॉर्पोरेशन (कॅनडा) सामंजस्य करार : शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे एकूण गुंतवणूक: 12 अब्ज डॉलर्स

४. कंपनीचे नाव: ब्लॅकस्टोन इन्क. (यूएसए) सामंजस्य करार: शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशाततील आर्थिक वाढीस चालना देणे एकूण गुंतवणूक: 5 अब्ज डॉलर्स

५. कंपनीचे नाव : टेमासेक कॅपिटल मॅनेजमेंट पीटीई लिमिटेड (सिंगापूर) सामंजस्य करार : शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे. एकूण गुंतवणूक : 5 अब्ज डॉलर्स

६. कंपनीचे नाव : सुमिटोमो रियल्टी अँड डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड (जपान) सामंजस्य करार : शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे. एकूण गुंतवणूक : 5 अब्ज डॉलर्स

७. कंपनीचे नाव : हिरानंदानी ग्रुप (भारत + दुबई) सामंजस्य करार : शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे एकूण गुंतवणूक: 6 अब्ज डॉलर्स

८. कंपनीचे नाव : के. रहेजा कॉर्प प्रायव्हेट लिमिटेड (भारत + सिंगापूर) सामंजस्य करार: शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे एकूण गुंतवणूक : 5 अब्ज डॉलर्स

९. कंपनीचे नाव: एव्हरस्टोन ग्रुप (सिंगापूर) सामंजस्य करार: शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे एकूण गुंतवणूक : 1 अब्ज डॉलर्स

१०. कंपनीचे नाव : सोतेफिन भारत प्रायव्हेट लिमिटेड (भारत + स्वित्झर्लंड) सामंजस्य करार: एमएमआरमध्ये पार्किंग सोल्यूशन्समध्ये बदल घडवून आणण्यासाठी थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे एकूण गुंतवणूक : 1 अब्ज डॉलर्स

११. कंपनीचे नाव : एमटीसी बिझनेस प्रायव्हेट लिमिटेड + मित्सुई (भारत + जपान) सामंजस्य करार : मुंबई महानगर प्रदेशात सर्क्युलर इकॉनॉमी पार्क विकसित करणे एकूण गुंतवणूक : सर्क्युलर इकॉनॉमी सहाय्य

## राजन साळवींचा अखेर ठाकरेंना जय महाराष्ट्र?



**मुंबई :** ठाकरे गटाला मोठे खिंडार पडणार असून रत्नागिरीतून त्याची सुरुवात होणार असल्याचा दावा शिंदे गटाचे आमदार उदय सामंत यांनी केला आहे. उद्या ठाकरे गटाच्या माजी आमदारांचा एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश होणार असल्याचेही ते म्हणाले. उदय सामंत यांच्या दाव्यामुळे राजन साळवी एकनाथ शिंदेसोबत जाणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे.

उद्योगमंत्री आज दावोस दौऱ्यावरून परतले आहेत. मुंबईत दाखल झाल्यानंतर त्यांनी माध्यमांशी बोलताना मोठा दावा केला. ठाकरे गटाचे ४ आमदार ३ आणि १० माजी आमदार एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत येणार असल्याचे त्यांनी सांगितले. रत्नागिरीतील काही माजी आमदार हे ठाकरे गटाला सोडून शिंदे गटात प्रवेश करणार असून या प्रवेशाचा पहिला ट्रेलर उद्या रत्नागिरीत पाहायला मिळेल, असेही ते म्हणाले.

उदय सामंत यांच्या दाव्यानुसार, ठाकरे गटाचे माजी आमदार राजन साळवी यांचा शुक्रवारी शिंदे गटात प्रवेश होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. राजन साळवी हे ठाकरे गटाचे कोकणातील मोठे नेते आहेत. परंतु, विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर ते नाराज असल्याच्या चर्चा आहेत. साळवी लवकर शिंदे गटात प्रवेश करतील अशा चर्चाही रंगल्या आहेत. त्यातच उदय सामंत यांनी मोठा दावा केल्याने राजन साळवी यांच्या शिंदे गटातील प्रवेशाच्या चर्चांना पूर्णविराम मिळेल का? हे उद्या स्पष्ट होईल.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीत आणि निवडणुकीनंतर पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी दखल न घेतल्याची भावना राजन साळवी यांच्या मनात असल्याचे म्हटले जात आहे. त्यांनी काही दिवसांपूर्वीच पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मातोश्रीवर भेट घेतली होती. या भेटीत साळवी यांनी माजी खासदार विनायक राऊत यांच्याबाबत उद्धव ठाकरेंकडे तक्रार केली होती. यावेळी उद्धव ठाकरे आणि राजन साळवी यांच्यात खडाजंगी झाल्याची माहिती होती. राजन साळवींच्या तक्रारीवर विनायक राऊतांना पक्षातून काढू की, जिल्हा प्रमुखाला काढू? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला. तसेच तुम्हाला भाजपमध्ये जायचे असेल तर जा, अशा शब्दांत ठाकरेंनी राजन साळवींना सुनावले होती, असे सूत्रांनी सांगितले होते.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २४ जानेवारी २०२५


# क्रीडामंत्री भरणेंचा 'तोल' गेला अन् कोसळले

**पुणे** : राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे गुरुवारी व्हॉलीबॉल खेळताना तोल जाऊन धाडकन पडल्याची घटना घडली आहे. यावेळी त्यांचे डोके एका लोखंडी पोलवर आदळणार होते, पण सुदैवाने ते थोडक्यात बचावले.

राज्याचे क्रीडामंत्री तथा इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते गुरुवारी पुण्याच्या मावळ येथील एका महाविद्यालयाच्या क्रीडा संकुलाचे उद्घाटन झाले. यावेळी त्यांनी तेथील खेळाडू व क्रीडा शिक्षकांसोबत विविध खेळांचा आस्वाद घेतला. त्यात व्हॉलिबॉल खेळण्याचा मोह त्यांना आवरता आला नाही. व्हॉलिबॉल खेळताना त्यांनी काही चेंडू चांगल्या पद्धतीने टोलवले. पण विरोधी बाजूने आलेला एक चेंडू अगदी जाळीजवळ पडण्याच्या स्थितीत होता. तो चेंडू टोलवण्यासाठी मंत्री भरणे त्याच्या दिशेने धावले असता त्यांचा अचानक तोल गेला आणि ते जमिनीवर कोसळले.

या अनपेक्षित घटनेमुळे तिथे उपस्थित सर्वचजण भांबावले. पण दत्तात्रय भरणे यांनी आपल्या चेहऱ्यावरील हास्य मावळू न देता पुन्हा खेळण्यास सिद्ध झाले. विशेष म्हणजे भरणे ज्या ठिकाणी पडले तेथून जवळच जाळीचा लोखंडी पोल उभा होता. त्याला त्यांची टक्कर झाली असती तर त्यांच्यावर बाका प्रसंग बेतला असता. पण लोखंडी पोलवर धडकण्यापूर्वीच त्यांनी स्वतःला सांभाळले. त्यामुळे त्यांचे डोके फुटण्यासाठी थोडक्यात बचावले. पण या घटनेत मंत्री महोदयांना थोडाफार मुक्कामारही लागला. पण ते वेळीच उभे राहिल्यामुळे राज्याच्या क्रीडामंत्र्यांची तंदुरुस्ती दिसून आली.

यावेळी बोलताना त्यांनी आपल्याला यात काहीसा मुक्कामार लागल्याची कबली दिली. मला थोडा मुक्कामार लागला. पण राज्याच्या राजकारणात २०१४ पडलो, पुन्हा २०१९ ला राज्यमंत्री झालो. आता कॅबिनेट मंत्री झालो. जो पडतो तोच सावरतो, असे ते आपल्याला या पडण्याने काहीच झाले असे सांगताना म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे कोरोना काळात दत्तात्रय भरणे यांचा एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला होता. त्यात भरणे हे आपल्या मतदारसंघातील एका गावात सुरपाट्या खेळताना दिसून आले होते. त्यावेळी ते म्हणाले होते, बालपण जगायला मिळणे ही प्रत्येकाचीच इच्छा असते. हा मोह मलापण आवरला नाही. त्यामुळे मी कोरोनाच्या तणावाच्या वातावरणात काम करत असताना निमगाव केतकी येथे सुरपाट्या खेळण्याचा आनंद घेतला. हा आनंद मला महाराष्ट्राच्या मातीत पुन्हा बघायचा आहे.

# वाल्मीक कराडची जिकडे तिकडे मालमत्ताच मालमत्ता



**बीड** : संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणात सध्या न्यायालयीन कोठडीत असलेला आरोपी वाल्मीक कराडच्या अनेक ठिकाणी मालमत्ता असल्याचे समोर आले आहे. त्याची दुसरी पत्नी ज्योती जाधव हिच्या नावावर सोलापूर येथील बार्शी येथे जवळपास ३५ एकर शेती असल्याची माहिती मिळाली होती. त्यातच आता ज्योती जाधव हिच्या नावावर लातूरातही चार ते पावणे पाच एकर जमीन असल्याची माहिती मिळत आहे.

बीड, परळी, पुणे, पिंपरी चिंचवड, सोलापूर नंतर आता लातूरमध्ये सुद्धा वाल्मीक कराडची मालमत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. लातूर-टेंभुर्णी महामार्गावर मुरुडच्या जवळील चार ते पावणे पाच एकर जमीन दुसरी पत्नी ज्योती जाधव हिच्या नावावर आहे. या जमिनीची किंमत कोट्यवधी रुपयांमध्ये असल्याचे सांगितले जात आहे.

वाल्मीक कराडच्या दुसऱ्या पत्नीला दोन मुले असून त्यांच्या नावावर पुण्यात संपत्ती विकत घेतल्याची माहिती आहे. पुण्यातील हडपसरमधील एमेनोरा पार्क टाऊनशीपमध्ये सेक्टर आर २१, टॉवर ३३ मध्ये एक तर दुसरा तर आर २१, टॉवर ३३, ८ नंबरचा दुसरा फ्लॅट आणि खराडीसह आणखी एक फ्लॅट ज्योती मंगल जाधवच्या नावावर असल्याचे समजले. शिवाय पुण्यातील फर्ग्युसन कॉलेज रोडवर कुशल वॉल स्ट्रीट इमारतीत ऑफिससाठी जागा घेतली असून ती मालमत्ता ज्योती जाधवच्या नावावर केली. कुशल वॉल स्ट्रीट या इमारतीचे काम सुरू होतानाच वाल्मीक कराडने इथे गुंतवणूक केली होती.

वाल्मीक कराडच्या दोन्ही पत्नींच्या नावावर एकूण १९ कोटी ७५ लाख रुपयांची मालमत्ती असल्याचे समोर आले आहे. वाल्मीक कराडच्या नावावर सर्वाधिक संपत्ती आहे. पहिली पत्नी मंजिरीच्या नावावर सव्वाचार कोटी रुपये, तर दुसरी पत्नी ज्योतीच्या नावावर तब्बल १७ कोटी ५० लाख रुपयांच संपत्ती असल्याची माहिती आहे.

# ठाकरेंचे ४ आमदार, ३ खासदार लवकरच शिंदे गटात

**मुंबई** : उद्धव ठाकरे यांना धक्क्यांवर धक्के बसत आहेत. काही दिवसांपूर्वीच बीड, नाशिक, परभणीमधील पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केला होता. ठाकरे गटाचे ४ आमदार, ३ खासदार आणि १० माजी आमदार लवकरच शिंदे गटात प्रवेश करतील, असा दावा मंत्री उदय सामंत यांनी केला आहे. उद्या या पक्षप्रवेशाचा पहिला टप्पा असल्याचे देखील उदय सामंत यांनी सांगितले.

तसेच माझी बदनामी करणाऱ्यांनी या पदाधिकाऱ्यांचा पक्षप्रवेश रोखून दाखवावा, असे आव्हानही त्यांनी विरोधकांना दिले. ते आज मुंबईत माध्यमांशी बोलत होते.

विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर शिवसेना ठाकरे गटाला गळती लागत असल्याचे दिसत आहे. उद्धव ठाकरेंची साथ सोडणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. याआधीही अनेक पदाधिकाऱ्यांनी इतर पक्षांमध्ये प्रवेश केला. त्यातील बहुतांश जणांनी धनुष्यबाण हाती घेतले आहे.

त्यातच आता उदय सामंत यांनी गुरुवारी दावोस दौऱ्यावरून मुंबईत दाखल झाल्यानंतर मोठा दावा केला. त्यामुळे ठाकरे गटाला मोठे खिंडार पडण्याची शक्यता आहे.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात उद्यापासून ठाकरे गटाला खिंडार पडण्यास सुरुवात होईल. याचा पहिला ट्रेलर उद्या तुम्हाला पाहायला मिळेल. ठाकरे गटाचे ४ आमदार, ३ खासदार आणि १० माजी आमदार तसेच काँग्रेसचे ५ आमदार व असंख्य जिल्हाप्रमुख एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेनेमध्ये सामील होतील, असा दावा उदय सामंत यांनी केला.

याचा पहिला टप्पा म्हणून उद्या रत्नागिरीत पहिला पक्ष प्रवेश होणार असून रत्नागिरीतील काही माजी आमदार हे ठाकरे गटाला सोडून शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

रत्नागिरीनंतर कोल्हापूरमार्गे सांगलीत जाणार आहे. सांगलीतून सातारा आणि साताऱ्यातून पुण्यात, असा पहिला टप्पा आहे. माझ्या नावाची बदनामी करणाऱ्यांनी आमच्या पक्षात येणाऱ्यांचे पक्ष प्रवेश रोखून दाखवावे, असे आव्हानही उदय सामंत यांनी विरोधकांना केले आहे. पुढील तीन महिन्यांत हे सगळे आमच्या पक्षात येतील. दररोज एक ब्रेकिंग न्यूज मिळेल, हा शब्द आहे, असेही ते म्हणाले.

उदय सामंत यांच्यासोबत शिंदे गटातील २० आमदार असल्याचा दावा विरोधकांकडून केला जात होता. यावरही त्यांनी प्रतिक्रिया दिली. काही नेते बालिश झाले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर आता न बोलले बरे, मी त्यांच्याबाबत नंतर सविस्तर बोलणार आहे. ज्यांचा राजकीय अस्त झाला आहे, त्यांचा राजकीय उदय करण्यासाठी माझ्या नावाचा उपयोग करत आहेत. हा माझा मोठेपणा आहे.

असल्या बालीशपणाने माझ्यात आणि एकनाथ शिंदे यांच्यामध्ये दरी निर्माण होणार नाही, असे म्हणत उदय सामंत यांनी संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २४ जानेवारी २०२५


## शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात दिला बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**बलसूर (प्रा.नागसेन कांबळे):** उमरगा तालुक्यातील बलसूर येथील श्री. छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात बुधवारी रोजी इयत्ता बारावी कला व विज्ञानच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष गोविंदराव सांळुके होते. यावेळी कोषाध्यक्ष दत्तात्रय बिराजदार, प्राचार्य सोमनाथ आवताडे, सेवानिवृत्त प्राचार्य श्नीपाद कुलकर्णी, उपमुख्याध्यापक रमेश चेंडकाळे, पर्यवेक्षक सतीश वाकडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. परमेश्वर सूर्यवंशी, बळीराम नांगरे, कवी एस.टी.गायकवाड आदीची उपस्थिती होती. यावेळी बोलताना सांळुके म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात आवडीचे क्षेत्र निवडून महाविद्यालयापासूनच क्रमिक अभ्यासाबरोबरच स्पर्धा परीक्षेची तयारी इयत्ता अकरावीपासून केल्यास हमखास ध्येय प्राप्ती होते.

विविध क्षेत्रात प्रावीण्य मिळवण्यासाठी जिद्द, चिकाटी, मेहणत,व सूक्ष्म पदध्तीने अभ्यास हवा आहे. थोर व्यक्तीच्या जीवनावर आधारित ग्रंथाचा अभ्यास करून आपल्या जीवनातही परिवर्तन करावे. आई वडील आणि गुरुजनांचे मार्गदर्शन कायम लक्षात ठेवावे.

प्रा.पी.आर.कांबळे, प्रा.एन.टी.तेलंग, कवी एस.टी.गायकवाड,श्नीपाद कुलकर्णी, यांचेही भाषण झाले.बारावील आठ विद्यार्थानाचा आदर्श विद्यार्थी म्हणून मानचिन्हे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. घटक चाचणी, प्रथम सत्र, सराव परीक्षेतील यशवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रा.बी.टी.जाधव यांनी केले.

तर सूत्रसंचलन प्रा.यु.पी.कांबळे व साक्षी मातोळे यांनी तर आभार प्राचार्य एस.ए.आवताडे यांनी मानले.

कार्यक्रमासाठी प्रा.आय.आर.पोतदार, प्रा.डी.आर.राठोड, प्रा.सचिन चव्हाण, प्रा.सचिन घोगे, प्रा.अक्षय जाधव,प्रा.वर्षा जगताप, प्रा.वामन भोरे, प्रा.जी.बी.पाटील, प्रा.विजय घोडके, अविनाश सुरवसे, भैरवनाथ सजे, के.डी.कांबळे, मधुकर सरवदे, हृदयनाथ कवठे आदींनी परिश्रम घेतले.

## माणसाचे मन मातीशी जुळल्यास अहंकार आपोआप गळून पडतो : अनंत कुलकर्णी




**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** माणसाचे मन मातीशी जुळल्यास, अहंकार आपोआप गळून पडतो, तो आपल्या परिश्रमातून कृतिशील कार्य करतो, असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप कार्यक्रमात सायगाव (डोंगरगाव) येथे पोलीस उपअधीक्षक श्री. अनंत कुलकर्णी यांनी केले.

जेईएस महाविद्यालय जालना च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'युवकांसाठी डिजिटल साक्षरता 'या विषयावर विशेष श्रमसंस्कार शिबिराचे दि.१६ते २२ जानेवारी दरम्यान सायगाव (डोंगरगाव) ता.बदनापूर जि. जालना येथे आयोजन करण्यात आले होते.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून जालनाचे जिल्हा पोलीस उपाधीक्षक श्री. अनंत कुलकर्णी तसेच सायगाव चे पोलीसपाटील श्री शत्रुघ्न बरांडे व दूधना शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. ज्ञानदेव घनघाव हे होते. व्यासपीठावर आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. पंढरीनाथ उनवणे आदीची उपस्थिती होती.

यावेळी राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. राजेश सरकटे यांनी केले. यावेळी सात दिवसाचया शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केलेल्या श्रमदानाच्या कामांची माहिती त्यांनी सांगितली.

जेईएस महाविद्यालयातर्फे सायगाव -डोंगरगाव येथे 'स्वच्छ घर - सुंदर घर' ही स्पर्धा ग्रामस्थ महिलांसाठी ठेवण्यात आलेली होती. यातील विजयी महिलांना अनुक्रमे प्रथम क्रमांक ३०००/- द्वितीय क्रमांक २०००/- तृतीय क्रमांक १०००/- उत्तेजनार्थ ५००/- रुपयांचे रोख बक्षिसे प्रमुख पाहुणे च्या हस्ते देण्यात आलेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना जिल्हा पोलीस उपाधीक्षक श्री अनंत कुलकर्णी म्हणाले की, माणसाचे मन मातीशी जोडल्यास आपोआप अहंकार गळून पडतो.

त्यांच्या परिश्रमातून कृतिशील कार्य घडते, पुढील दहा वर्षात युवाशक्ती देशाचा चेहरा बदलू शकते ,युवकच देशाची खरी शक्ती आहे, त्यांनी गुन्हेगारीकडे न वळता समाजकार्य व विधायक कार्याकडे वळावे, श्रमदान हे अतिशय श्रेष्ठ कार्य आहे.

श्रमाची कुठलीही लाज माणसाला नसावी, जीवनामध्ये शरीर संपदा सुदृढ असणे आवश्यक आहे, आई-वडिलांचे श्रममूल्य युवकांनी जीवनात विसरू नये, असेही श्री. कुलकर्णी यांनी सांगितले.अध्यक्ष भाषणात प्राचार्य डॉ. अग्निहोत्री म्हणाले की, युवकांसाठी सर्वच काम सारखी असून कुठल्याही अहंकार त्यांनी मनात बाळगू नये,'नॉट मी बट यु' म्हणजेच माझ्यासाठी नव्हे केवळ तुमच्यासाठी मी कार्य करेल, असे वागावे. मानवाकडे सहजीवन, सहअस्तित्व ,सहकार्य असावे, शिवाजी महाराजांचा आदर्श समोर ठेवून युवकांनी कार्य करावे असेही त्यांनी सांगितले.

यावेळी शिबिरार्थी विद्यार्थी तसेच सायगाव-डोंगरगाव येथील ग्रामस्थ व आदर्श विद्यालय सायगावचे विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच प्रा. किशोर तापडिया, प्रा.नागनाथ शेवाळे, प्रा. सूर्यकांत चौगुले ,प्रा. सुनिल इंदूरकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. योगेश लहामटे यांनी मानलेत. शिबिर यशस्वी करण्याकरता श्री. भरत अहिरे ,श्री. आनंद काळे श्री. विजय सुलाने, श्री .आकाश ठोंबरे श्री. गजानन घोडके यांनी विशेष परिश्रम घेतलेत.

## ७०० कलाकारांचा भव्य सांगीतिक महोत्सव

**पुणे :** येथील माईर्स एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि एमआयटी आर्टस्, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने 'वंदन भारतमातेला' या अभिनव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारी रोजी सायंकाळी ४.३० वाजता राजबाग लोणी काळभोर येथील संत ज्ञानेश्वर-संत तुकाराम महाराज विश्वशांती घुमटाच्या प्रांगणात हा भव्य कार्यक्रम साकारणार आहे.

कार्यक्रमात चित्रकर्मी आणि व्ही शांताराम फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. किरण शांताराम, सुप्रसिद्ध गायक-संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर आणि प्रख्यात गायिका उषाताई मंगेशकर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. स्व. राज कपूर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आणि भारतरत्न लता मंगेशकर यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पखवाज वादनाने होणार असून, त्यानंतर तबला, व्हायोलिन, बासरी यांसारख्या पारंपरिक वाद्यांसोबतच सिंथेसायझर आणि गिटार यांसारख्या आधुनिक वाद्यांचा समावेश असलेला संगीत महोत्सव रंगणार आहे. ७०० हून अधिक गायक आणि वादक एकत्र येऊन सिनेसृष्टीतील गाजलेली गीते आणि देशभक्तीपर रचनांचे सादरीकरण करणार आहेत.

भारतीय प्रजासत्ताकाच्या ७५ व्या वर्षानिमित्त आयोजित या कार्यक्रमाच्या माध्यमातून भारतीय लोकशाही मूल्यांवरील श्रद्धा आणि विश्वास व्यक्त केला जाणार आहे. एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड आणि कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस यांनी या कार्यक्रमाची सविस्तर माहिती पत्रकार परिषदेत दिली.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २४ जानेवारी २०२५


## प्रतिभा निकेतन माध्यमिक विद्यालयात निरोप, कॉलेज डे साजरा

### ज्ञान घेऊन समाजासाठी उपयोग करा : कमलाकर भोसले



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील प्रतिभा निकेतन उच्च माध्यमिक विद्यालयात दि.२२ वार बुधवार रोजी १२ वी विद्यार्थ्यांना निरोप व कॉलेज डे साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना कमलाकर भोसले म्हणाले विद्यार्थ्यांनी ज्ञान घेऊन समाजासाठी उपयोग करावा असे प्रतिपादन केले. उमरगा तालुक्यातील प्रतिभा निकेतन उच्च माध्यमिक विद्यालय मुरूम येथील १२ वी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, प्राध्यापक पदभार स्वीकारत दिवसभर शालेय प्रशासनह सांभाळले.

उमरगा तालुक्यातील प्रतिभा निकेतन उच्च माध्यमिक विद्यालय मुरूम येथील बारावीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन बुधवार (दि.२२) उत्साहात साजरा झाला. स्वयंशासन दिनाचे एक दिवशीय प्राचार्य म्हणून अपर्णा मनाळे तर उपप्राचार्य म्हणून लक्ष्मी मेनसे आणि भक्ती गायकवाड व निकिता वाकळे हिने पर्यवेक्षक कामकाज सांभाळले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य करबाप्पा ब्याळे, प्रमुख अतिथी कमलाकर भोसले,प्रमुख उपस्थिती उपमुख्याध्यापक उल्हास घुरघुरे, ज्येष्ठ प्रा.संजय गिरी, प्रा.उमाकांत महामुनी आदींची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख पाहुणे यांचे मनोगत व्यक्त करताना भोसले पुढे म्हणाले मानव बनण्याचे सामर्थ्य आपल्या मध्ये निर्माण झाले पाहिजे जो मुलगा आपल्या आई - वडिलांना पालक व शेपू समजतो त्याचा कडीपत्ता झाल्याशिवाय राहत नाही.

मी कोण आहे याचे आपल्याला माहीत असले पाहिले.आपण काय करणार आहोत हे आपल्या लक्षात घेता आले पाहिजे.चागला माणूस बना व या शाळेचे नाव लवकिक करा असे मनोगत व्यक्त केले.

या स्वयंशासन दिनानिमित्त १२ वीच्या विद्यार्थी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी दिलेले विषयावर वेळापत्रकानुसार प्रभावी अध्ययन केले.

वर्गात असणाऱ्या विद्यार्थ्यांनीही केलेल्या अध्यापनाबाबत आनंद व्यक्त केला. दुपारच्या सत्रात स्वयंशासन दिनाची सां

गता प्राचार्य करबाप्पा ब्याळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी एक दिवसीय प्राचार्य अपर्णा मनाळे, उपप्राचार्य लक्ष्मी मेनसे, विद्यार्थीनी बोळशेट्टे आदींनी मनोगत व्यक्त केले. उत्कृष्ट अध्यापन करणाऱ्या एक दिवशीय शिक्षकांचा प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढून व तसेच विविध खेळात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी प्रा. पटवारी शोभा,महामुनी उमाकांत प्रा. शाळु राजीव,प्रा. कांबळे आण्णाराव, प्रा.नारायण सोलंकर,प्रा अजित सूर्यवंशी, प्रा.राठोड दयानंद, प्रा.धर्माधिकारी राघवेंद्र, प्रा.अंबर विश्वजीत,प्रा दीपक सांगळे, प्रा.गायकवाड अमोल, प्रा.वाकडे रत्नदीप, जमादार सलीम, राठोड अजित, कु.उण्णद रेखा,सगशेट्टी महेश, कु.महामुनी साक्षी,फि रोज कागदी, अप्पासाहेब कोळी आदीनी यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

प्रणिता सगर, सृष्टी व्हणाजे हिने सूत्रसंचालन केले तर श्वेता व्हणाजे हिने आभार मानले.

## डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली




**छत्रपती संभाजीनगर (प्रा. डॉ. प्रतिभा धोंडकर) :** येथील डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने दि. २३ जानेवारी २०२५ गुरुवार रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार, डॉ. अन्विता अग्रवाल, कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. शरद देशमुख, कार्यक्रम प्रमुख प्रा. रवींद्र परभाणे, डॉ. प्रभाकर गायकवाड यांची मंचावर उपस्थिती होती.आजच्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मीनल श्रीगिरीवार यांनी केले. आजच्या आधुनिक युगात स्वातंत्र्य सैनिकांच्या कर्तृत्वाची जाणीव करून देण्यासाठी, भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील त्यांच्या अद्वितीय योगदान आणि प्रेरणादायी नेतृत्वाला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला जातो. असे कार्यक्रम आयोजित करणे किती महत्त्वाचे आहे हे आपल्या प्रास्ताविकेतून त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्राध्यापक शरद देशमुख यांनी नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या प्रतिमेस वंदन करून त्यांच्या स्वातंत्र्याच्या खडतर प्रवासाची आठवण उपस्थित प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना करून दिली. देशभक्ती काय असते हे त्यांनी विविध प्रसंगांचे दाखले देऊन सांगितले.

देशाप्रती असलेले त्यांचे प्रेम त्यांच्या कार्यातून दिसून येत होते. "तुम मुझे खून दो, मै तुम्हे आजादी दूंगा" या घोषवाक्य द्वारे नेताजींची राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम दिसून येते असे प्रा. शरद देशमुख यांनी सांगितले. जरी स्वातंत्र्य मिळाले असले तरी आजच्या एकविसाव्या शतकात उत्साही व्यक्तींची गरज आहे, एकनिष्ठ एकसंघ होऊन देशाला विकासाच्या मार्गावर न्यावे असे सुंदर मत यावेळी त्यांनी मांडले.

आजच्या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी केले. याप्रसंगी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना नेताजींची विचारसरणी आचरणात आणावी, एकसंघ होऊन पुढे जावे, राष्ट्राप्रती निष्ठा ठेवावी असे मत प्रतिपादित केले. कार्यक्रमाचे आभार प्रगटन प्रा. रवींद्र परभाणे यांनी केले.





